**विशेष दिवाणी दावा क्र. ३५/२०२३**

*CNR No. MHSO060003012023*

नागनाथ ताठे देशमुख

*वि.*

लिलावती जाडकर वगैरे

**निशाणी क्र. १३ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांची कैफियत स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यांनी कथन केले की, दावा चालविण्यासाठी वयोमानाने ते वेळोवेळी न्यायालयात येऊ शकलेले नाहीत. आजारी असल्याकारणाने देखील त्यांना त्यांची कैफियत वेळेत दाखल करता आलेली नाही. दाव्याचे स्वरुप पहाता गुणवत्तेवर निकालाकामी त्यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी. प्रतिवादी अर्ज मंजूर करण्याची विनंती करतात.

०२. वादीतर्फे म्हणणे मांडण्यात आले की, प्रतिवादींनी ९० दिवसांच्या आत कैफियत दाखल करणे आवश्यक होते. तथापि, प्रतिवादींनी वेळेत कैफियत दाखल केलेली नाही. तसेच आजारपणाचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दावा हा करारपुर्तीचा आहे. वादी व प्रतिवादी दोघेही जेष्ठ नागरीक आहेत. दावा विनाकैफियत चालविण्याचा आदेश झाल्यानंतर वादीने पुरावा दाखल केलेला नाही. उलटपक्षी वादीचा निशाणी क्र. १० वरील तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज प्रलंबित आहे. सबब, उपरोक्त बाबी पहाता वादाचे गुणवत्तेवर निराकरण होणेकामी प्रतिवादींना संधी देणे योग्य होईल. तथापि, विलंबाची बाब पहाता, खर्च आकारुन संधी देणे योग्य होईल. करीता खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज रु. १,०००/– च्या खर्च रकमेवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादींनी वादीस दिल्यानंतर प्रतिवादींविरुध्द विना कैफियत चालविण्याचा झालेला आदेश रद्द समजण्यात येऊन त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

३. प्रतिवादींनी पुढील तारखेपर्यंत खर्च रक्कम भरावी.

४. खुल्या न्यायालयात घोषीत.

स्वाक्षरी/–

दि. ०८.०४.२०२४

( नीलेश सु. बुद्रुक )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | 2nd Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 08/04/2024 |
| Order uploaded on | : | 08/04/2024 |